निवडणूक प्राधान्य

``आदेश``

जा.क्र.नांवाशमनपा/निवड/~~१३६~~ 157/२०१७
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दि. ०७.०९.२०१७

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ निवडणूक प्रक्रीया संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे करिता मिडीया कक्ष निर्माण करणे बाबत.**

**संदर्भ :-** मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा/२०१७/प्र.क्र.४७/का-०५, दि. २१.०७.१७

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक पूर्व तयारीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. त्याअनुषंगाने निवडणूक प्रक्रीया संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे करिता खालील प्रमाणे पथक स्थापन करण्यात येत असून पथकात खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. तसेच पथक प्रमुख यांनी मुख्य कार्यालय मनपा येथे तात्काळ मिडिया कक्ष स्थापन करावे.

| अ.क्र. | कक्षाचे नांव | पथक प्रमुख | सहायक अधिकारी व कर्मचारी | सोपवलेली कामे |
|---|---|---|---|---|
| १ | मिडिया कक्ष | श्री. दिलीप बनसोडे, शिक्षणाधिकारी | १) श्री. पाचंगे रामचंद्र व्ही (अधिक्षक), जिल्हा व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण संस्था, नांदेड | १) निवडणूक प्रक्रीये संदर्भात पत्रकारांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देणे.<br>२) निवडणूक कार्यक्रमांतर्गत दररोज येणारे नामनिर्देशपत्राची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन पत्रकारांना उपलब्ध करुन देणे<br>३) वेळोवेळी होणाऱ्या निवडणुकीच्या बैठकीची माहिती उपलब्ध करुन देणे.<br>४) आयुक्तांशी समन्वय करुन आवश्यकतेनुसार पत्रकार परिषद आयोजित करणे व चहाव व अल्पोहाराची व्यवस्था करणे.<br>५) इतर निवडणुकीशी संबंधित कामे पार पाडणे. |

उपरोक्त कामे पार पाडण्यासाठी पथक प्रमुखांनी स्वतः लक्ष ठेऊन कामे पार पाडून घ्यावी, नियुक्त पथकातील अधिकारी / कर्मचारी यांनी एकमेकाशी समन्वय साधून काम विहित वेळेत पूर्ण करुन घ्यावे.

आयुक्त तथा निवडणूक अधिकारी
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रतिलिपी माहितीस्तव व अनुपालनास्तव :-

१) प्राचार्य, जिल्हा व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण संस्था, नांदेड

२) सर्व संबंधितांना अनुपालनास्तव

प्रतिलिपी माहितीस्तव :-

सर्व निवडणूक निर्णय अधिकारी मनपा सार्वत्रिक निवडणूक २०१७

आयुक्त तथा निवडणूक अधिकारी
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जा.क्र.नांवाशमनपा/निवडणुक/ 152 2017
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक 07/09/2017

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017
## // जाहिर सूचना //

मा. राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक 2017 साठी निवडणूक कार्यक्रम दिनांक 06.09.2017 अन्वये घोषित केलेला असून आज दिनांक 06.09.2017 पासून ते निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत म्हणजेच दिनांक 12.10.2017 पर्यंत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे. निवडणूकी करीता निवडणूक विषयक पॉम्पलेट, पोस्टर्स छापणे, प्रकाशीत करणे आदी बाबींसाठी सर्व मुद्रक, प्रकाशक व संबधीत व्यक्तींना सुचित करण्यात येते की, राज्य निवडणूक आयोगाने भिंतीपत्रक व पोस्टर्स किंवा निवडणूक विषयक प्रचार साहित्य छापणे व प्रसिध्द करण्यास प्रतिबंध आदेश 1995 नुसार खालील प्रमाणे निर्बंध घातलेले आहेत.

1. कोणत्याही इसमास निवडणूक विषयक पत्र, किंवा पोस्टर्स ज्यावर मुद्रक व प्रकाशक यांचे नांव व पत्ता टाकलेला नाही असा मजकुर छापता किंवा प्रकाशीत करता येणार नाही.
2. कोणत्याही मुद्रकाने निवडणूक विषयक पत्रक किंवा पोस्टर्स ते प्रसिध्द करणा-या इसमाकडून त्याचे ओळखी बाबतचे, त्यांनी स्वाक्षरीत केलेले व प्रसिध्द करणा-या इसमाची ओळख मुद्रकास ज्ञान असलेल्या व्यक्तीने साक्षांकित केलेले प्रतिज्ञापत्र दोन प्रतीत घेतल्याशिवाय छापता कामानये.
3. सदर मुद्रकाने छापण्यात आलेले पत्रक किंवा पोस्टर्सची एक प्रत प्रकाशकाचे प्रतिज्ञापत्राचे एक प्रतीसह वाजवी वेळेत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अथवा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका येथे दाखल केली पाहीजे.

वरील पैकी कोणत्याही तरतुदीचा भंग केल्यास दोषीव्यक्ती, कायद्यातील तरतुदीनूसार दंडात्मक कार्यवाहीस पात्र ठरेल.

दिनांक : 06.09.2017
ठिकाण : नांदेड

वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

स्वा/-
आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

C:\Documents and Settings\elect-dept\Desktop\Acharsanhita २०१७.doc